**पोलीस अधीक्षक कार्यालय , सातारा**
९३, मल्हारपेठ, सातारा - ४१५ ००१ (Maharashtra)
कार्यालय - ०२१६२ २३२२२५ फॅक्स - ०२१६२ २३०२३२
(ई-मेलsp.satara@mahapolice.gov.in)


---

क्रमांक - ७१८ /वानिशा/ बंदी आदेश/२०२६ दिनांक -०३/०९/२०२६

---

## प्रेसनोट

सातारा शहरामध्ये रविवार दि.०६/०९/२०२६ रोजी पीबीजी सातारा हिल हाफ मॅरेथॉन-२०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेवेळी वाहतुकीस कोणताही अडथळा येवू नये म्हणून पहाटे ०५.०० वा. ते सकाळी १०.०० पर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीत बदल करणेत येत आहे.

**अ) <u>वाहतुकीकरीता बंदी घालण्यात येणारे मार्ग :-</u>**

सातारा हिल मॅरेथॉन स्पर्धा ही पोलीस परेड ग्राउंड येथे सुरूवात होवून पोवई नाका - मरिआई कॉम्प्लेक्स - शाहु चौक - अदालत वाडा मार्गे - समर्थ मंदिर - बोगदा - यवतेश्वर - प्रकृती हेल्थ रिसॉर्टच्या पुढे ५०० मीटर पासून वळून परत त्याच मार्गाने समर्थ मंदिर - अदालत वाडा - नगरपालीका - शाहू चौक - मरिआई कॉम्प्लेक्स - पोवई नाका मार्गे - पोलीस परेड ग्राउंड हा मार्ग **रुग्णवाहिका, पोलीस वाहने, अग्निशामक दलाची वाहने वगळून** सर्व वाहनांना स्पर्धा कालावधीमध्ये प्रवेश बंद राहिल.

**ब) <u>वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग :-</u>**

१) शिवराज पेट्रोल पंप, अजंठा चौक व गोडोली मार्गे सातारा शहरात येणारी सर्व वाहने ग्रेड सेपरेटर मार्गाने डी.बी.कदम मार्केट - राधिका सिग्नल येथून सातारा शहरात ये-जा करतील.

२) बॉम्बे रेस्टॉरन्ट चौकातून सातारा शहरात येणारी सर्व वाहने जिल्हा परिषद चौक - कनिष्क हॉल चौक - रिमांड होम मार्गे - जुना आर.टी.ओ.चौक अथवा बांधकाम भवन - उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय चौक - मुथा चौक - रिमांड होम मार्गे - जुना आर.टी.ओ.चौक- सुभाषचंद्र बोस चौक ( भुविकास चौक ) मार्गे सातारा शहरात ये-जा करतील.

३) मुख्य बसस्थानक - राधिका सिग्नल - तहसिल कार्यालय मार्गे राष्ट्रीय महामार्ग कडे जाणारी सर्व वाहने ही ग्रेड सेपरेटर मार्गाने सातारा शहराच्या बाहेर जातील.

४) सज्जनगड,ठोसेघर,परळी कडून येणारी - जाणारी सर्व वाहने ही शेंद्रे मार्गे खिंडवाडी रोडने शिवराज पेट्रोल पंप, अजंठा चौक व गोडोली नाका मार्गे सातारा शहरात येणारी सर्व वाहने ग्रेड सेपरेटर मार्गाने डी.बी.कदम मार्केट - राधिका सिग्नल येथून सातारा शहरात ये - जा करतील.

५) कास बाजूकडून सातारा शहर बाजूकडे येणारी वाहने मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यंत - प्रकृती हेल्थ रिसॉर्ट बाजु कडुन सातारा बाजूकडे येणार नाहीत ती पर्यायी मार्गाने एकीव फाटा - एकीव - मोळेश्वर - कुसुंबीमुरा - कुसुंबी - मेढा मार्गे सातारा शहराकडे येतील.

**क) <u>पार्किंग :-</u>**

१) हिल हाफ मॅरेथॉन स्पर्धेकरीता येणारे स्पर्धकांनी व नागरीकांनी आपली वाहने ही **१) प्रशासकीय इमारत व संग्रहालयाचे मधील मोकळी जागा २) जुनी भुविकास बँक येथील बेसमेंट पार्किंग ३) लँडमार्क टॉवर परिसर (चारही बाजुंनी ) ४) शाहु स्टेडीयम प्रवेशदवाराचे आतील उजवी बाजुकडील पार्किंग या ठिकाणी लावण्यात यावीत.**

**तरी या बदलाची सर्व नागरीकांनी नोंद घेवून सातारा पोलीस दलास सहकार्य करावे.**

**प्रति - संपादक**
**आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिदध व्हावे**

**पोलीस अधीक्षक सातारा करीता**




Scanned with OKEN Scanner